30 JUN 2023

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील 'तंत्रज्ञान'च्या ११० विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२२-२३ मध्ये ११० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हमधून अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थी विविध अभियांत्रिकी शाखांमधून पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिकत आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ प्रशासनाने अभिनंदन केले आहे.

विविध शाखांचा अभ्यासक्रम औद्योगिक कौशल्य, संशोधन व गुणवत्ता विकास यावर आधारित असल्यामुळे विद्यार्थी सक्षम अभियंता बनण्यास मदत होते. शिवाजी विद्यापीठाचे सेंट्रल प्लेसमेंट सेल आणि अधिविभागाचे प्लेसमेंट सेल यांच्या मदतीने अनेक कंपन्यांचे कॅम्पस ड्राईव्ह विभागामध्ये होत आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वर्षाला ३ ते ८ लाखांचे पॅकेज दिले आहे.



कोल्हापूर : राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एन सपली, गणेश पाटील आदी.

विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राला पूरक रोजगार संधी उपलब्धतेसाठी विभागाचे प्लेसमेंट सेल अधिकारी प्रयत्नशील आहेत. दरवर्षी प्लेसमेंट सेलमार्फत व्याख्यान, चर्चासत्र, करिअर परामर्श, व्यक्तिमत्व विकास कार्यशाळांचे आयोजन केले जाते. निवड झालेल्यांमध्ये केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांचा समावेश आहे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी,, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायरमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवडीसाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. संचालक डॉ. एस. एन. सपली, प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील आदी कार्यरत आहेत.


# नागरी सहकारी बँकांनी प्रगतीसाठी एकत्र येण्याची गरज

## छत्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे मोठे आव्हान आहे. त्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने नॅशनल को–ऑपरेटिव्ह फायनान्शियल अँड डेव्हलपमेंट कंपनी (एन.सी.एफ.डी.सी.) ही छत्र संस्था निर्माण करण्याचे महत्वाचे पाऊल उचलले आहे. त्याचा लाभ घेऊन सर्व नागरी सहकारी बँकांनी एकत्र येऊन प्रगती केली पाहिजे, असे आवाहन छत्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑप इंडिया अध्यासन, गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'छत्र संस्था आणि नागरी सहकारी बँकांसमोरील रिझर्व्ह बँकेशी निगडित समस्या समजून घेताना' हा या कार्यक्रमाचा विषय होता. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : बँकांच्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमात बोलताना छत्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर.**

खिरवाडकर म्हणाले, भारतातील २८ राज्यांपैकी अवघ्या ११ राज्यांत सहकारी बँका आहेत. केंद्रशासित प्रदेशात अथवा ईशान्येकडील राज्यांत एकही सहकारी बँक नाही. गेली २७ वर्षे नागरी सहकारी बँकांची संक्रमणावस्था संपतच नाही. या काळात सदर बँकांची संख्या २२०० वरुन १४०० पर्यंत खाली आली आहे. आणखीही ६०–७० बंद होण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्यक्षात देशातील व्यापक लोकसंख्येला नागरी सहकारी बँकांची आवश्यकता असताना, नेमके कोठे चुकते याचा विचार करण्याची गरज आहे. गरजेतून विविध समित्या नेमून परिस्थितीचा वेध घेण्यात आला.

दास कमिटीने सर्वप्रथम नागरी सहकारी बँकांसाठी छत्र संस्थेची शिफारस केली. त्यातून ही संस्था या वर्षअखेरपर्यंत कार्यान्वित होते आहे. देशातील नागरी सहकारी बँकांना संघटित करून समस्या सोडवणे हा हेतू आहे. सहकारी बँकांना मदत करून योग्य सल्ला देणे, तंत्रज्ञानाचा वापर करून एकात्मिक संरचना निर्माण करणे प्रमुख उद्दिष्ट आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील बँकिंगशी निगडित केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ आणि बँकिंग विश्वाचे सहसंबंध दृढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. भविष्यात दोन क्षेत्रांनी एकत्र येऊन नव्या पिढीशी जोडण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. बँकिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना इंटर्नशीप कशी मिळवून देता येईल. तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याने सायबर सुरक्षेच्या दृष्टीने मनुष्यबळास प्रशिक्षित करता येईल.

असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, मुंबईचे लेखापरीक्षक धनंजय गोखले आणि रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजेंद्र पडवळ यांनी स्वागत केले. महेश धर्माधिकारी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कोल्हापुरातील विविध नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आज वाणिज्य, व्यवस्थापन इमारतीचे भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या इमारतीचा भूमिपूजन समारंभ शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ११.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

समारंभास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# एम. फिल., पीएच. डी. कोर्स वर्कसाठी सोमवारपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२३ एम.फिल., पीएच. डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमासाठी परीक्षा अर्ज करण्याची ३ जुलैपर्यंत मुदत आहे. या मुदतीत विद्यार्थ्यांना महाविद्यालय, अधिविभागात विनाविलंब शुल्क अर्ज करता येणार आहे. महाविद्यालय व अधिविभागांना ४ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज अॅप्रुव्ह करता येणार आहे. त्यानंतर ६ जुलै रोजी महाविद्यालयांना परीक्षा अर्जाच्या याद्या सादर कराव्या लागणार आहेत. एम.फिल., पीएच. डी. कोर्स वर्क परीक्षा २४ जुलै रोजी होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# पंढरपूर वारीत 'एनएसएस'कडून विविध सेवा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीत सेवा दिली. स्वच्छ वारी, निर्मल वारी, स्वस्थ वारी, हरित वारी आणि यंदाचे विशेष म्हणजे प्लास्टिकमुक्त वारी अशी विविध अभियाने व उपक्रम वारीत राबविण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी लोणंद येथे माऊलींच्या पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. लोणंदच्या नीरा घाटावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या या 'स्वच्छ व हरित वारी' अभियानाचे उद्‌घाटन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. डी.के. मोरे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, डॉ. डी. बी. जाधव, डॉ. एन.बी. माने आदी उपस्थित होते. सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे १५० विद्यार्थी-विद्यार्थिनी या स्वच्छता अभियानात सहभागी झाले. लोणंद येथे परिसर स्वच्छता आणि प्लास्टिक कचरा संकलन करून नगरपरिषदेच्या व्यवस्थेकडे सुपुर्द करण्यात आला. यावेळी माजी एन.एस.एस. संचालक डॉ. सुधीर इंगळे, प्रा.पाडवी, प्रा. संदीप पाटील, अमोल कुलकर्णी आदी उपस्थित होते.